# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१
ई-मेल आयडी :-sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ ओळखपत्र /१५४० / सन २०२० दि.०६/०५/२०२०

**निवडणुक / महत्वाचे**

**वाचावे** :- इकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा / ओळखपत्र / सन २०१४ दि.२९.१०.२०१४

**प्रस्तावना :-**

ज्याअर्थी, सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी शासनाने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठीत केले असून, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका होणार आहेत. सहकारी संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूका, रिक्त पदांच्या निवडणूका, पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली पार पाडावयाच्या आहेत. सहकारी संस्थांच्या सर्व प्रकारच्या निवडणूका मोकळया व भयमुक्त वातावरणात तसेच अचूक व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याचे धोरण प्राधिकरणाने निश्चित केलेले आहे.आणि

ज्याअर्थी, निवडणूक पारदर्शक व निर्दोष पद्धतीने पार पाडण्याचे दृष्टिने मतदार यादीमध्ये मयत सभासदांची नावे नसणे तसेच तोतया मतदान / बोगस मतदान होऊ नये हया दृष्टिने देखील खबरदारी घेणे गरजेचे आहे. देशभरात केंद्रीय निर्वाचन आयेगाने १९९४ पासून छायांकित ओळखपत्र देण्याचे काम सुरु केले आहे.आणि,

ज्याअर्थी, उक्त वाचावे नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने सहकारी संस्थांच्या निडणूकांमध्ये मतदान करताना मतदाराची ओळख पटविणे बाबत आदेश निर्गमित केलेले असुन त्यात सुधारणा करावाच्या आहेत. आणि,

त्याअर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण उक्त वाचावे मधील आदेश अधिक्रमित करुन सहकारी संस्थांच्या निडणूकांमध्ये मतदान करताना मतदाराची ओळख पटविणेच्या पुराव्याबाबत खालीलप्रमाणे सुधारित आदेश देत आहे.

### -: आदेश :-

सहकारी संस्थांच्या निडणूकांमध्ये मतदान करताना मतदाराची ओळख पटविणे यासाठी खालील पुराव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करण्याच्या सुचना मतदान केंद्राध्यक्ष मतदारास करेल व त्यानुसार मतदाराची ओळख पटल्यानंतरच मतदारास मतदान करु देईल.

१. भारतीय / राज्य निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र.

२. पासपोर्ट

३. वाहन चालविण्याचा परवाना

४. आयकर विभागाकडील पॅन कार्ड

५. केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहीत दिलेले ओळखपत्र

६. राष्ट्रीयकृत बँका / पोस्ट ऑफिस यामधील फोटो असणारे पासबुक

७. स्वातंत्र्य सैनिकांचे ओळखपत्र (फोटोसहीत)

८. सक्षम प्राधिकाऱ्याने अनुसूचित जाती / जमाती / इतर मागासवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / इतर मागासवर्ग इ. फोटोसहीत दिलेले प्रमाणपत्र

९. सक्षम प्राधिकाऱ्याने फोटोसहीत दिलेला अपंगत्वाचा दाखला

१०. फोटोसहीत देण्यात आलेला शस्त्रास्त्राचा परवाना

११. राष्ट्रिय ग्रामिण योजना खालील फोटो असलेले ओळखपत्र

१२. निवृत्त कर्मचाऱ्यांचे फोटो असलेले पासबुक

१३. केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेल्या आरोग्य विमा योजनेचे फोटोसहीत कार्ड

१४. आधार ओळखपत्र

उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधीने मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप घेतल्यास किंवा मतदाराने सादर केलेल्या ओळखपत्राच्या पुराव्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत संपूर्ण शहानिशा करेल व आवश्यक वाटल्यास इतर ओळखपत्राच्या पुराव्यांची मागणी करुन मतदाराच्या ओळखीची संपूर्णत: खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु देईल. जर एखादा मतदार अशा ओळखीबाबतचा समाधानकारक पुरावा / कागदपत्र सादर करु न शकल्यास त्यास मतदान करू देवू नये. कोणत्याही परिस्थितीत तोतया मतदाराकडून मतदान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदान केंद्राध्यक्ष यांची असेल.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांचे मान्यतेने.**

06/05/2020

**(यशवंत गिरी)**
**सचिव**
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रती,

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व).
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व).

यांना कळविण्यात येते की, सदर बदल निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निदर्शनास आणाव्यात.

प्रत माहितीस्तव :-

१. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे.
४. मा.आयुक्त (दुग्धविकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस, वरळी, मुंबई.